**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**प्रादेशिक बातम्या**
**सकाळी 7 वा. 10 मि.**

**दिनांकः 03.03.2021** **वारः बुधवार**

---

ठळक बातम्या

- कौटुंबिक जबाबदारी, शेती- व्यवसाय सांभाळून मुक्त विद्यापीठातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीमध्ये सर्वाधिक योगदान असल्याचे राज्यपालांचे प्रतिपादन
- महाकृषी ऊर्जा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
- कोरोनाची परिस्थिती हाताळण्यात राज्य शासन अपयशी ठरल्याचा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा विधानसभेत आरोप
- शेतकऱ्यांचे कृषीपंप आणि वीज ग्राहकांच्या थकबाकीसंदर्भात विधीमंडळात चर्चा होऊन निर्णय होईपर्यंत कुणाचीही वीज जोडणी कापू नये- उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश
- स्टेट बँक ऑफ इंडियाच्या गृह कर्ज व्याज दरात आणखी सवलत
- पुणे विमानतळाला 5 ते 15 दशलक्ष प्रवाशांच्या विभागात स्वच्छतेचा पुरस्कार

## राज्यपाल प्रतिपादन

कौटुंबिक जबाबदारी, शेती- व्यवसाय सांभाळून मुक्त विद्यापीठातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीमध्ये सर्वाधिक योगदान असल्याचे प्रतिपादन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी काल केले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा 26 वा दीक्षान्त समारंभ कुलपती भगत सिंह कोश्यारी यांच्या दूरस्थ उपस्थितीत काल झाला. त्यावेळी ते बोलत होते. या दीक्षान्त समारंभात नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांना आभासी पद्धतीने पदवी प्रदान करण्यात आली. कोरोना काळात टाळेबंदीमुळे घरूनच शिक्षण घेणे आवश्यक झाले. अशा वेळी यशवंतराव चव्हाण मुक्त

विद्यापीठाची तंत्रज्ञानावर आधारित दूरस्थ शिक्षण पद्धती सर्व विद्यापीठांसाठी मार्गदर्शक ठरली, असे कोश्यारी म्हणाले. पदवी मिळाल्यावर स्नातकांनी आपले शिक्षण न थांबवता निरंतर सुरू ठेवून चांगल्या समाजाच्या निर्मितीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

## मुख्यमंत्री निर्देश

शेतकरी बांधवांना दिवसा आणि पुरेशी वीज देणे ही शासनाची प्राथमिकता असून महाकृषी ऊर्जा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. महाकृषी ऊर्जा अभियानांतर्गत कृषी ऊर्जा पर्वाचा प्रारंभ काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विधानभवनात झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, ऊर्जा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे आदी उपस्थित होते. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास सरकारचे प्राधान्य असून नुकतेच नीती आयोगासोबत झालेल्या दृकश्राव्य बैठकीत पीक विम्याचा प्रश्न उपस्थित केला असल्याचेही ठाकरे यांनी सांगितले. इतरांसाठी मळे फुलवणाऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात काटे येऊ नयेत यासाठी त्यांच्या आणि त्यांच्या कटुंबियांच्या मागे सरकार ठामपणे उभे राहील, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्र्यांनी दिली.

## महाराष्ट्र विधिमंडळ

राज्य विधी मंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात काल दुसऱ्या दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या आभारदर्शक प्रस्तावावरच्या चर्चेला सुरुवात झाली.

*विधानसभेत शिवसेनेचे सुनील प्रभू यांनी चर्चेला सुरुवात केली. कोरोनाच्या काळात महसूलात मोठी घट झाली, केंद्राकडून जीएसटीची वाढलेली थकबाकी असूनही शेतकऱ्यांना दिलासा देण्याचं काम सरकारने केले, असे त्यांनी सांगितले. या चर्चेत सहभागी होताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले. हे सरकार संवेदनशील नसल्याचा आरोप त्यांनी केला. संकटकाळात शेतकऱ्यांना सरकारने मदत दिली नाही, कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे. पूजा चव्हाण मृत्यूप्रकरणी कारवाई का नाही असा सवाल त्यांनी केला. कोरोनाची परिस्थिती हाताळण्यात राज्य शासन अपयशी ठरल्याचा आरोप फडणवीस यांनी केला. दरम्यान, शेतकऱ्यांचे कृषीपंप आणि वीज ग्राहकांच्या थकबाकीसंदर्भात विधीमंडळात चर्चा होऊन निर्णय होईपर्यंत कुणाचीही वीज जोडणी कापू नये, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल*

*दिले. विधीमंडळ अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून विजेवर चर्चा घेण्याचा आग्रह विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी धरला. त्यावर वीज थकबाकीसंदर्भात विशेष बैठक आयोजित करून चर्चा करण्याची सरकारची तयारी असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.*

*वाढीव वीजदेयकांच्या मुद्यावरून विरोधकांनी विधानपरिषदेत केलेल्या गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज काल 20 मिनिटांसाठी स्थगित करावे लागले. विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी यासंदर्भात स्थगन प्रस्ताव मांडत वीज देयकांच्या मुद्द्यावर तातडीने निर्णय घेण्याची आणि चर्चा करण्याची मागणी केली. दरेकर यांनी मांडलेल्या स्थगन प्रस्तावावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आश्वस्त केले की, या अधिवेशनात वीज देयकांच्या मुद्द्यावर विशेष सत्रात चर्चा करून याबद्दल राज्य सरकारची भूमिका विषद केली जाईल. विधानपरिषदेतही काल राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या आभार दर्शक ठरावावरच्या चर्चेला सुरुवात झाली. कोविड व्यवस्थापनात इतर राज्यांच्या तुलनेत राज्य सरकार कमी पडले, अशी टीका विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी या चर्चेदरम्यान केली. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत गट क पदभरतीसाठी नुकत्याच झालेल्या परिक्षेवेळी परीक्षा केंद्रांवर गोंधळ निर्माण झाल्याची चर्चा सुरू आहे, यासंदर्भात वस्तुस्थिती तपासून आवश्यकता भासल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल आणि वेळ पडल्यास या परीक्षा पुन्हा घेण्यात येतील अशी ग्वाही अजित पवार यांनी काल विधानपरिषदेत दिली. यासंदर्भात भाजपाचे विनायक मेटे यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्याला ते उत्तर देत होते .*

## लातूर

लातूर तालुक्यातील रायवाडी येथे गावकऱ्यांनी बसवलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा प्रशासनाने काढला आहे. याबाबत नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन सरकारने त्वरित रायवाडी येथे हा पुतळा पूर्ववत उभारावा, अशी मागणी आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी काल विधानसभेत केली.

## कोविड-देश

देशात आत्तापर्यंत 1 कोटी 48 लाखांहून अधिक नागरिकांचे कोविड लसीकरण झाले असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयांने दिली आहे.

यापैकी 2 लाखांहून अधिक रुग्ण 60 वर्षे वयावरील आणि 45 ते 59 वयोगटातील अन्य आजार असलेले आहेत. नऊ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 100 टक्के अथवा 90 टक्क्यांहून जास्त नोंदणीकृत आरोग्य कर्मचाऱ्यांना लसीची पहिली मात्र देण्यात आली आहे. देशभरात सध्या 1 लाख 68 हजार 358 रुग्णांवर उपचार सुरू आहेत. उपचाराधीन रुग्णांमध्ये सर्वाधिक 78,825 रुग्ण महाराष्ट्रातले आहेत तर 48,159 उपचाराधीन रुग्ण केरळमधले आहेत. राज्यात काल सुमारे 8,000 नवे कोरोनाबाधित आढळले.

## स्टेट बँक - व्याज दर कपात

स्टेट बँक ऑफ इंडियाने गृह कर्जाच्या व्याजदरात कपात केली आहे. 75 लाखांच्या गृह कर्जापर्यंत 6.70 टक्के व्याज दर आकारण्यात येणार असून 75 लाखांपुढील गृह कर्जावर 6.75 टक्के व्याज आकारण्यात येईल. नवीन कर्ज दराची ही योजना 31 मार्चपर्यंत उपलब्ध असून, कर्जदाराला प्रक्रिया शुल्कावर 100 टक्के सूट देण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला कर्जदारांना विशेष सूटही बँकेने जाहीर केली आहे.

## नाग नदी

नागपूर शहरातून वाहणाऱ्या नाग नदीतील प्रदूषण कमी करण्याच्या प्रकल्पासाठी सुमारे 2,117 कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल याबाबत झालेल्या बैठकीनंतर ही घोषणा केली. राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत मंजूर असलेला हा प्रकल्प राष्ट्रीय नदी संरक्षण निदेशालय राबवणार आहे.

## अमरावती विमानतळ

अमरावती विमानतळासाठी 6 कोटी 45 लाख रूपयांचा निधी वितरीत करण्याचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाने घेतला आहे. जिल्ह्याच्या विकासात महत्वपूर्ण ठरणाऱ्या अमरावती विमानतळाच्या कामासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिल्यामुळे आता विमानतळाचे काम गतीने पूर्ण होईल, असा विश्वास राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केला आहे.

अमरावतीच्या बेलोरा विमानतळाच्या विकासाचे काम महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीतर्फे होत असून अमरावती शहर आणि जिल्ह्याच्या विकासासाठी आणि

व्यापार-व्यवसाय, उद्योगवाढीच्या दृष्टीने याचा लाभ होणार आहे. शासनाकडून प्राधिकरणाला निधी प्राप्त झाल्याने आता धावपट्टी, संरक्षण भिंत आदी कामांना गती मिळेल, असे कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक गौरव उपशाम यांनी सांगितले.

## लोहगाव विमानतळ

आशिया - प्रशांत विभागातील देशांच्या यादीत पुण्यातील लोहगाव आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्वच्छतेच्या बाबतीत सर्वोत्कृष्ट विमानतळाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

*मॉन्ट्रियल स्थित आंतरराष्ट्रीय विमानतळ परिषदेने केलेल्या पाहणीत पुण्याच्या लोहगाव विमानतळाला स्वच्छतेचा हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याची माहिती भारतीय विमानतळ प्राधिकरणाने दिली आहे. या परिषदेतर्फे विमानतळावरील सेवा सुविधांच्या त्याचबरोबर अन्य काही निकषांच्या आधारे सर्वेक्षण करून सर्वोत्कृष्ट विमानतळाचे हे पुरस्कार दिले जातात. 5 ते 15 दशलक्ष प्रवाशांच्या विभागात पुण्याच्या विमानतळाला हा पुरस्कार मिळाला आहे. स्वच्छतेचे सुयोग्य निकष पाळण्यात पुणे विमानतळाला 4.96 गुण मिळाले असून या विभागातील अन्य बहुतेक विमानतळांना सरासरी 4.30 गुण प्राप्त झाले आहेत. विमान प्रवाशांना जागतिक दर्जाची सेवा सुविधा पुरवण्यातही पुणे विमानतळाचा क्रमांक लागला आहे. पुण्याबरोबरच अमृतसर, कोलकत्ता, चंदिगढ आणि वाराणसी विमानतळांचा सर्वोत्कृष्ट सुविधा पुरवणाऱ्या विमानतळाच्या यादीत समावेश झाला आहे.*

## नाशिक कांदा

नाशिक जिल्ह्यातल्या प्रमुख बाजारपेठेत गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे भाव घसरले आहेत. पंधरा दिवसांपूर्वी 4,000 रूपये क्विंटलवर पोहोचलेल्या कांद्याचे भाव गेल्या काही दिवसात 2,400 ते 2,500 रूपये क्विंटलपर्यंत घसरल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मात्र कांद्याच्या भावात 100 रूपयांची वाढ झाली. लाल कांद्याला किमान 1 हजार ते कमाल 2,740 आणि सरासरी 2,500रूपये क्विंटल तर पांढऱ्या कांद्याला किमान 860 तर कमाल 1,390 आणि सरासरी 1,250 रूपये प्रति क्विंटल असे भाव मिळाले.

## काळाराम

नाशिकच्या श्री काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह स्मृती दिनानिमीत्त काल मंदिरात कोरोना नियमांचे पालन करत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. नाशिकचे माजी महापौर अशोक दिवे, रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे यांच्यासह अनेक स्थानिक लोकप्रतिनिधींनी या कार्यक्रमांना हजर राहून अभिवादन केले. हा लढा मानव मुक्तीच्या लढ्यातला महत्वाचा टप्पा मानला जातो. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 2 मार्च 1930 नाशिक इथल्या श्री काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला होता. त्यानिमीत्त दरवर्षी हा स्मृतीदिन पाळला जातो.

## अहमदनगर

राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या नावलौकिकाप्रमाणे उत्कृष्ट कार्य करून सर्वांच्या सहकार्याने महात्मा फुले कृषि विद्यापीठ हा ग्लोबल ब्रँड तयार करणार असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉक्टर प्रशांतकुमार पाटील यांनी काल केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर स्वागत समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक ढवण होते. यावेळी डॉ. पाटील यांनी आपल्या भाषणात पुढील पाच वर्षात विद्यापीठाने करावयाचा कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्याचा आराखडा मांडला.

## मुंबई

सागरी किनारा मार्ग या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाअंतर्गत बोगद्याचे 100 मीटर पर्यंतचे खोदकाम नुकतेच पूर्ण झाले. या खोदकामासाठी ‘मावळा हे संयंत्र वापरले जात आहे. याच संयंत्राच्या मदतीनं 47 कंकणाकृती कडा उभारायचे कामही पूर्ण झाले आहे. सध्या अशाच तात्पुरत्या स्वरुपातल्या 7 कडा उभारल्या आहेत, अशी माहिती महानगरपालिकेच्या पूर्व उपनगर क्षेत्राच्या आयुक्त अश्विनी भिडे यांनी काल दिली.

या प्रकल्पाअंतर्गतच्या दोन बोगद्याचे खोदकाम प्रियदर्शनी पार्क येथून केले होते. हे बोगदे प्रियदर्शनी पार्क ते नेताजी सुभाष मार्गालगत 'छोटा चौपाटी'पर्यंत खोदले जातील. दोन्ही बोगद्यांसाठी जमिनीखाली 10 मीटर ते 70 मीटरपर्यंत खोदकाम केले जात आहे.

हे काम साधारण 9 महिन्यांमधे संपेल असे नियोजन असून कामासाठी अतिरिक्त 2 महिन्यांचा कालावधी ज़मेस धरला आहे.

**<u>निषेध – सोलापूर</u>**

इंधन दर वाढीविरोधात काल सोलापूर शहर युवक काँग्रेसने आंदोलन केले. यावेळी केंद्र सरकारच्या विरोधात घोषणा देत इंधन दरवाढीचा निषेध नोंदवण्यात आला.

**<u>निधन जळगाव</u>**

महाराष्ट्र राज्य साहित्य परिषदेच्या जळगाव शाखेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. किसन पाटील यांचे काल अल्प आजाराने निधन झाले. ते 67 वर्षांचे होते. डॉ. किसन पाटील यांनी जळगावच्या मू. जे. महाविद्यालयात मराठी विभागाचे प्रमुख, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला विद्याशाखेचे अधिष्ठाता, तसेच एस. एन. डी. टी. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

**<u>निधन बुलडाणा</u>**

बुलडाणा जिल्हा भाजपचे जेष्ठ नेते आणि माजी जिल्हाध्यक्ष घनश्यामदासजी उर्फ काकाजी गांधी यांचे काल वृद्धापकाळाने निधन झाले. ते 84 वर्षांचे होते. काल दुपारी जळगाव जामोद येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सलग 10 वर्षे ते भाजपचे जिल्हाध्यक्ष होते. भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सुद्धा ते सदस्य होते. पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद विरोधी पक्षनेते अशा विविध पदांची जबाबदारीही त्यांनी सांभाळली होती.

**<u>आग – नंदुरबार</u>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या आष्टे शिवारातल्या वनविभागाच्या जंगलाला सोमवारी रात्री आग लागली. ती आटोक्यात आणण्यासाठी ग्रामस्थांनी वनविभागाच्या मदतीने आटोकाट प्रयत्न केले. अनेक वर्षांपासून हे पाचशे हेक्टर क्षेत्र राखीव जंगल म्हणून घोषित होते. या जंगलात जनावरांसाठी चारा, तसेच बांबू, साग अशा झाडांचीही लागवड केली होती. शिवाय या जंगलात मोर आणि बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणावर आहे. आगीत नेमके काय नुकसान झाले ते पाहणीनंतरच स्पष्ट होईल.

**<u>हवामान</u>**

राज्यात उद्या सकाळपर्यंत हवामान कोरडं राहील असा वेधशाळेचा अंदाज आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार. वारंवार आवाहन करुनही मास्क परिधान करण्याबाबत निष्काळजीपणा दिसून येत आहे. आपल्यासोबतच इतरांचीही काळजी घेणं आपल्याच हातात आहे. म्हणूनच मास्क वापरा, हात वारंवार स्वच्छ धुवा, सुरक्षित अंतर राखा आणि विश्वासार्ह बातम्यांसाठी ऐकत राहा, आकाशवाणी, नमस्कार.